संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# वाढत्या तापमानाचे आक्रमण

गेल्या आठवड्याभरापासून राज्यातील उष्म्यात अनपेक्षितपणे वाढ झाली आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र या सगळ्या ठिकाणी तापमानाचा पारा ४० ते ४५ च्या दरम्यान आहे. तिकडे पश्चिम बंगालच्या उपसागरामध्ये 'मोका' या चक्रीवादळाची शक्यता व्यक्त होते आहे. हवामानातला हा अचानकपणे होत असलेला बदल तापमानातही वाढ करणारा ठरेल, असा अंदाज वेधशाळेने व्यक्त केला आहे. म्हणजे असे समजायला हरकत नाही की पुढचे तीन आठवडे मुंबईसह राज्यातले तापमान याच पद्धतीचे राहील. राज्याच्या काही भागांत हा पारा वाढण्याची शक्यता असल्याने वेधशाळेने यलो अलर्टही दिलेला आहे. वर्षभराचे हे ऋतुमान लक्षात घेतले तर उन्हाळ्यातला हा वैशाखवणवा दरवर्षीच जाणवत असतो. परंतु साधारणतः गेल्या वीस-पंचवीस वर्षांतला आढावा घेतला तर काही प्रमाणात तापमानातली वाढ सातत्याने नोंदली गेल्याचे लक्षात येते. आणि यातला महत्त्वाचा फरक असा आहे की, याच्यापेक्षा जास्त उष्मा विदर्भ, खानदेश, मराठवाड्यातील लोकांनी सहन केलेला आहे. परंतु अलिकडच्या काळातील हा उकाडा असह्य स्वरूपाचा पाहायला मिळतो. म्हणजेच तो सहन करणे कठीण होऊन जाते. अगदी सूर्य मावळल्यावरसुद्धा रात्रीच्या तापमानामध्ये फारसा फरक पडत नाही. उलट ठिकठिकाणी एअर कंडिशन, कुलर यासारख्या गोष्टींचा भरपूर प्रमाणात वापर करावा लागतो. गेल्या आठवडाभरात राज्यातील विजेची मागणीसुद्धा जवळपास पंचवीस टक्क्यांनी वाढल्याचे समोर येते. साधारणपणे पंधरा हजार मेगावॅटची गरज असताना या वाढत्या उकाड्यामुळे राज्यातली विजेची मागणी २६ हजार मेगावॅटवर जाऊन पोहोचली आहे. यावरून वाढत्या उष्म्याचा परिणाम किती मोठा आहे हे लक्षात येते. हा सगळाच निसर्गचक्राचाच भाग असल्याने त्याबाबतीत तातडीने लोकांना दिलासा मिळेल. अशी कोणतीही उपाययोजना करता येत नाही. फक्त लोकांनी या उष्म्यापासून स्वतःचा बचाव करण्याकरिता कोणकोणते उपाय करावेत. या सूचना देण्याचे कामच सरकारी यंत्रणांकडून होऊ शकते.

**थंड हवेची गरम ठिकाणे**

वेगाने बदलत असलेले हे हवामान दिवसेंदिवस तापदायक होत चालले आहे. म्हणजे अगदी जी थंड हवेची ठिकाणं आहेत. जिथे उन्हाळ्याच्या काळात लोक हमखासपणे काही काळासाठी जाऊन राहतात, तिथेसुद्धा या उन्हाचा कडाका जाणवतो आहे. महाराष्ट्रातले महाबळेश्वर, माथेरान, लोणावळा, यासारख्या ठिकाणीसुद्धा उन्हाचा कडाका तिथे गेलेल्या पर्यटकांना सोसावा लागतो आहे. तिथले तापमानदेखील आज १५ अंश सेल्सिअसच्या खाली नाही. विशेषतः सकाळचा दहा वाजेपर्यंतचा काळ सोडला तर दुपारच्या वेळात ही थंड हवेची ठिकाणेसुद्धा गरम झालेली पाहायला मिळतात. हे महाराष्ट्रातच होते असे नाही तर देशाच्या अनेक भागांत असलेली मग अगदी कुलुमनालीपासून ते सिमला किंवा माऊंटअबूपर्यंत अशा अनेक ठिकाणी दुपारच्या वेळातले तापमान वाढलेले असते. म्हणजे नैसर्गिकरित्या तिथले हवामान खरोखरच दिलासादायक असायला हवे तिथेदेखील आता या वाढत्या तापमानाचे आक्रमण होताना दिसते. या परिस्थितीत कृत्रिमरित्या तयार केलेल्या थंड वातावरणाचा दिलासा हवा असतो. म्हणजेच एसी किंवा कुलरमधला गारवाच दिलासा देणारा ठरतो. परंतु आता यासाठी लागणारी ज्यादा वीज उपलब्ध करणे हेसुद्धा तितकेच मोठे आव्हान ठरते आहे. आजच्या घडीला महाराष्ट्रात दहा हजार मेगावॅटचा तुटवडा आहे म्हणजे ही वीज निर्माण करण्याची क्षमता महाराष्ट्राकडे नाही. आणि ही अतिरिक्त विजेची गरज केंद्राच्या मदतीने भागवली जाते आहे. थोडक्यात विचार केला तर वाढते तापमान आणि वाढती विजेची मागणी यामध्ये समतोल राखणे दिवसेंदिवस तितकेच जिकीरीचे होते आहे. म्हणूनच या काळात अपारंपारिक पद्धतीने अधिकाधिक वीजनिर्मिती करणे उपयुक्त ठरते. सौर ऊर्जा यासाठी खूप मदतीची ठरू शकते. दुर्दैवाने सरकारकडून या सौर ऊर्जेच्या वापराला योग्य ते प्रोत्साहन दिले जात नाही. ग्रामीण भागात तर या कडाक्याच्या उन्हाळ्यातसुद्धा जेव्हा लोड शेडिंग होते तेव्हा सामान्य जनतेचे काय हाल होत असतील याची आपण कल्पना करू शकतो. अर्थातच केंद्र किंवा राज्य सरकारांना सातत्याने वाढत जाणाऱ्या विजेच्या मागणीची पूर्तता करावी लागते आहे.

**वाढती सिमेंटची जंगले**

स्वाभाविकपणे केवळ तापमान वाढते आहे असे म्हणून जबाबदारी झटकता येणार नाही. या तापमान वाढीला जे जे काही घटक कारणीभूत आहेत त्यावर नियंत्रण मिळवणे म्हणजेच वाढत्या तापमानाला लगाम घालण्याचा उपाय तितकाच गरजेचा ठरतो. जगभरात वाढलेले औद्योगिकरण त्यातून बाहेर पडणारा कार्बनडायऑक्साईड, प्रचंड वाहनांची संख्या आणि जागोजागी उभी राहणारी सिमेंटची जंगले ही त्याची प्रमुख कारणे सांगता येतात. किती प्रमाणात वनीकरण केले, वृक्षारोपण केले किंवा जंगलांचे संवर्धन केले तरी ही सिमेंटची जंगले सर्वात धोकादायक ठरत आहेत. म्हणूनच आता ग्रीन हाऊस किंवा पर्यावरणपूरक घरे काळानुसार गरजेची ठरत आहेत. ही घरे मोठ्या प्रमाणावर बांधली जावीत म्हणून सरकारने काही सक्तीच्या योजना केल्या आहे. परंतु नुसत्या सक्तीऐवजी सामान्य लोकांनासुद्धा ग्रीन हाऊस किंवा पर्यावरणपूरक घरे म्हणजे काय हे समजावून सांगितले पाहिजे. आणि अशा घरांच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन म्हणून सवलती दिल्या पाहिजेत. दुर्दैवाने पर्यावरणपूरक योजनांच्याबाबतीत अजूनही खूपच हलगर्जीपणा दाखवला जातो. पर्यावरणाचे परिणाम समोर दिसत असतानाही त्यासंदर्भातल्या उपाययोजनांना दुर्लक्षित करण्याचेच परिणाम आज भोगावे लागत आहेत. म्हणूनच प्रचंड प्रमाणात होत असलेले नागरीकरण आणि मुंबईसारख्या महानगरांमध्ये पुनर्विकासाच्याअंतर्गतसुद्धा टोलेजंग इमारतींचे जंगल उभे राहते आहे. अशावेळी केवळ वाढत्या तापमानाच्या नावाने बोटे मोडून चालणार नाहीत तर निसर्गाला डावलून अत्यंत बेदरकारपणे होत असलेला तथाकथित विकास विनाशालाच आमंत्रण देणारा ठरतो.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

स्वभाव हा फ्री हॉटस्पॉट सारखा असला की कोणत्याही पासवर्डची गरज पडत नाही. लोक आपोआप कनेक्ट होत जातात. कारण प्रभाव चांगला असण्यापेक्षा स्वभाव चांगला असणं महत्वाचं असतं.

## पंचांग

**शनिवार, १३ मे २०२३**
**शक १९४५ शोभननामसंवत्सर**

**वैशाख कृष्ण अष्टमी/नवमी * नक्षत्र : धनिष्ठा**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ००-१८ मकर**
**००-१९ ते २४-०० कुंभ**

**रवी उदय- ०६-०६**
**रवी अस्त- १९-०४**

**तुंबरू जयंती**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

## पाककृती



### मशरूम आणि बेबी कॉर्न करी

★ **साहित्य-** बटण मशरूम - २ पॅकेट (४०० ग्रॅम), बेबी कॉर्न - १ पॅकेट २०० ग्रॅम, कढीपत्ता - मूठभर, वसंत कांदा - १ कप, कोथिंबीर - मूठभर, कांदे - २ मोठे, लसूण - ८-१० कळ्या, आले-लसूण पेस्ट - २ टीस्पून, लाल तिखट - २ चमचे, गरम मसाला पावडर - १ टीस्पून, काळी मिरी पावडर - २ टीस्पून, लाल तिखट - १ टीस्पून, हळद - १ टिस्पून, चवीनुसार मीठ, टोमॅटो केचप - ४ टीस्पून, सोया सॉस - १ टीस्पून, लाल मिरची शेझवान सॉस - ४ टीस्पून, लिंबाचा रस - २ टीस्पून व्हिनेगर - १ टीस्पून, कॉर्नफ्लोअर - १ टीस्पून, तेल - १ टीस्पून

★ **कृती :-** गॅसवर एक मोठे भांडे ठेवा आणि त्यात कढीपत्ता घालून भाजून घ्या. नंतर त्यात तेल टाकून गरम करून त्यात कढीपत्ता तळा. नंतर त्यात बारीक चिरलेला लसूण घालून गरम मसाला घाला. जेव्हा कांदा गुलाबी होऊ लागेल तेव्हा चिरलेला वसंत कांदा घाला आणि १ मिनिट शिजवा. आता आले-लसूण पेस्ट आणि लाल तिखट घाला आणि २ मिनिटे शिजवा. नंतर सर्व सॉस (सोया, टोमॅटो केचअप, लाल मिरची, शेजवान सॉस) घाला. काही मिनिटांत त्यात काळी मिरीची पूड, हळद, मीठ, व्हिनेगर आणि लिंबाचा रस घाला. आता मशरूम कापून घ्या आणि दोन भाग करा. त्याचप्रमाणे बेबी कॉर्नचे लहान तुकडे करा. या दोन गोष्टी ग्रेव्हीमध्ये टाका. त्यावर भांडे झाकून ठेवा आणि सुमारे १० मिनिटे शिजू द्या. ३ टीस्पून पाण्यात कॉर्नफ्लोअर मिक्स करावे. हे ग्रेव्हीमध्ये मिक्स करावे आणि ढवळत गॅस बंद करा. तुमची ग्रेव्ही तयार आहे. सर्व्हिंग भांड्यात घ्या आणि नान, पराठा किंवा भातासोबत सर्व्ह करा.



# मुंबईच्या सूर्यकुमार यादवची शतकी खेळी
# ६ षटकार आणि ११ चौकार ठोकत १०३ धावा



**वानखेडे स्टेडियमवर गुजरातविरुद्ध झालेल्या आयपीएल सामन्यात मुंबईच्या सूर्यकुमार यादवने नाबाद १०३ धावांची खेळी केली. डावाच्या शेवटच्या चेंडूवर षटकार ठोकत त्याने आपले शतक पूर्ण केले. या खेळीत त्याने ११ चौकार आणि ६ षटकार मारले. त्याचे हे पहिलेच आयपीएल शतक आहे.त्याच्या खेळीमुळे मुंबई इंडियन्सने २१८ धावांवर मजल मारली. या धावसंख्येचा पाठलाग करताना गुजरातने ११ षटकांत ५ गडी गमावत ९० धावा केल्या.**

■ मुंबई

**प्रथम** फलंदाजी करावी लागलेल्या मुंबई इंडियन्सने पॉवर प्लेमध्ये दमदार सुरूवात केली. गेल्या काही सामन्यापासून दुहेरी आकडाही न गाठू शकणाऱ्या रोहित शर्माने अखेर आपला जुना खेळ दाखवण्यास सुरूवात केली. इशान किशन आणि रोहित शर्माने चौथ्या पाचव्या षटकातच मुंबईला अर्धशतकी मजल मारून दिली. मुंबई इंडियन्सने ६ षटकात १० च्या सरासरीने ६१ धावा केल्यानंतर त्यांचा डाव गडगडला. राशिद खानने रोहित शर्माला २९ धावांवर बाद केले. त्यानंतर इशान किशनची २० चेंडूतील ३१ धावांची खेळी खेळी देखील संपवली. यानंतर नेहल वधेराला १५ धावांवर बाद करत राशिद खानने मुंबईची अवस्था ३ बाद ८८ अशी केली.

त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि विष्णू विनोद यांनी चौथ्या विकेटसाठी ६५ धावांची भागीदारी रचत मुंबईला १५ व्या षटकात १५० धावांपर्यंत मजल मारून दिली. मात्र २० चेंडूत ३० धावा करणाऱ्या विनोदची मोहित शर्माने विकेट घेत ही जोडी फोडली. त्यानंतर आलेला टीम डेव्हिड ५ धावा करून राशिद खानची शिकार झाला. मात्र दुसरीकडे आपल्या अर्धशतकाजवळ पोहचलेल्या सूर्यकुमार यादवने आपला गिअर बदलला होता. १७ व्या षटकात ४७ धावांपर्यंत पोहचलेल्या सूर्यकुमारने तुफान फटकेबाजी करण्यास सुरूवात केली. त्याने १८ व्या षटकात २०, १९ व्या षटकात १७, तर २० व्या षटकात १७ धावा चोपल्या. त्यामुळे मुंबईने २१८ धावा केल्या. सूर्याने ४९ चेंडूत ११ चौकार आणि ६ षटकार ठोकत नाबाद १०३ धावा केल्या. त्याने शेवटच्या चेंडूवर षटकार ठोकत आपले शतक पूर्ण केले. सूर्याचे हे आयपीएलमधील पहिले वहिले शतक आहे.

## आजचे सामने

2023 IPL

SUNRISERS HYDERABAD वि. LUCKNOW SUPER GIANTS
**वेळ: ३.३०, हैद्राबाद**

DELHI CAPITALS वि. KINGS XI PUNJAB
**वेळ: ७.३०, दिल्ली**

# विश्व मल्लखांब स्पर्धेत रुपालीचे शानदार यश



■ मुंबई

चेंबूर येथील लोकमान्य शिक्षण संस्था आणि शरद आचार्य क्रीडा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जवाहर विद्या भवन केंद्रात सराव करणाऱ्या रुपाली सुनील गंगावणेने भुतान येथे नुकत्याच संपन्न झालेल्या जागतिक मल्लखांब स्पर्धेत शानदार कामगिरी करताना भारताला २ सुवर्ण ३ रौप्य पदके पटकावून दिली. या कामगिरीबाबत रुपाली, तिचे प्रशिक्षक व वडील आंतरराष्ट्रीय पंच सुनील गंगावणे, प्रमुख मार्गदर्शक महेंद्र चेंबूरकर सर यांचे खास अभिनंदन लोकमान्य शिक्षण संस्था परिवाराकडून करण्यात आले.

# नंदुरबारमध्ये होणार भव्य खो-खो स्पर्धा

■ मुंबई

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने २०२३-२४ या वर्षातील कुमार-कुमारी (ज्युनियर) गटाची राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धा नंदुरबारमध्ये होणार असल्याची घोषणा महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सरचिटणीस गोविंद शर्मा यांनी केली. त्याचबरोबर स्पर्धेसाठी निवड समिती सदस्य, प्रशिक्षक व फिजिओ यांची सुध्दा नियुक्ती जाहीर केली. साधारणपणे ही स्पर्धा ऑक्टोबर महिन्यामध्ये होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. किरण मेटकरी (सांगली), सुनील चव्हाण (सोलापूर), मनोज परदेशी (नंदूरबार), सारिका जगताप (सातारा) यांचा कुमार-कुमारी गटांच्या निवड समितीत समावेश करण्यात आला आहे. कुमार गटाच्या प्रशिक्षकपदी प्रताप शेलार (ठाणे), सहाय्यक प्रशिक्षकपदी संतोष कर्नाळे (सांगली) आहेत. कुमारी गटाचे प्रशिक्षकपदी श्रीकांत गायकवाड (मुंबई), सहाय्यक प्रशिक्षकपदी सुप्रिया गाढवे (धाराशिव) आहेत. फिजिओ डॉ. अमित र्व्हाटे (सांगली) असतील.

# सेंच्युरी रेयॉन संघ अंतिम फेरीत दाखल

■ ठाणे

सेंच्युरी रेयॉन संघाने झी इंटरटेनमेंट संघावर सात विकेट्सनी पराभव करत ठाणे वैभव आणि स्पोर्टिंग क्लब कमिटी आयोजित ३५ षटकांच्या ४७ व्या आंतर कार्यालयीन क्रिकेट स्पर्धेच्या 'क' गटात अंतिम फेरीत स्थान मिळवले. सेंट्रल मैदानात झालेल्या उपांत्य फेरीच्या लढतीत झी इंटरटेनमेंट संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. मधल्या फळीतील फलंदाज वगळता इतरांनी सपशेल निराशा केल्याने झी इंटरटेनमेंटला ३३ षटकात १४४ धावांवर समाधान मानावे लागले. विशाल दीक्षितने संघासाठी सर्वाधिक ३७ धावांचे योगदान दिले.

प्रथमेश कडू (२९), निलंय डागा आणि दर्पण मेहताने प्रत्येकी १२ धावा केल्या. सामनावीर ठरलेल्या प्रदीप पांडे आणि रोशन जाधवने प्रत्येकी तीन विकेट्स मिळवत झी इंटरटेनमेंटच्या धावसंख्येवर अंकुश ठेवला. उत्तरादाखल सेंच्युरी रेयॉन संघाने ३०.४ षटकात ७ बाद १५१ धावसंख्येसह विजय मिळवला. विनय केणे (४०), प्रशांत तरणे (२६), प्रदीप पांडेने नाबाद २२ धावांची खेळी करत फलंदाजीत आपली उपयुक्तता सिद्ध केली.

# 'ब्रेबॉर्न' वर मुलींची क्रिकेट स्पर्धा

■ मुंबई

क्रिकेट क्लब ऑफ इंडियाच्या वतीने त्यांचे माजी अध्यक्ष माधव आपटे यांच्या स्मरणार्थ १५ वर्षांखालील मुलींच्या पहिल्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १५ ते १७ मे या कालावधीत ब्रेबॉर्न स्टेडियम येथे खेळविण्यात येणाऱ्या या स्पर्धेत मुंबईतील नामवंत सहा अकॅडमीचे संघ सहभागी होणार आहेत.या सहा संघांची दोन गटांत विभागणी करण्यात येणार असून, प्रत्येक संघाला किमान दोन साखळी सामने खेळण्याची संधी मिळणार आहे.

## पश्चिम रेल्वे

**एडब्ल्यूएस ट्रॅक-डीव्हाईस उपकरणांचा पुरवठा आणि पुन:स्थापना**

एडीएसटीई/डब्ल्यू-I/एमएमसीटी निविदा सूचना क्र. SG_623_1624_AWS_WA_R Dtd 11.05.2023, कामाचे नाव : पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागाच्या चर्चगेट - विरार उपनगर सेक्शनमध्ये एडब्ल्यूए ट्रॅक - डीव्हाईस इक्व्यूपमेंट एक्सेसरीज पुरविणे आणि पुन:स्थाना. कामाचे अंदाजित मूल्य : रु. ७६,६८,१७५.७५/-. जेथे ई-निविदा खुली होईल, त्या कार्यालयाचा तपशील : वरिष्ठ विभागीय संकेत आणि दूरसंचार अभियंता (दक्षिण), २ रा मजला, विभागीय रेल्वे व्यवस्थापकांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८. **इसारा रक्कम ठेव** : रु. १,५३,४००.००/- **ई-निविदेचा प्रकार** : खुली ई-निविदा, ई-निविदा दस्तावेज सादरीकरण बंद होण्याची तारीख व वेळ : ०२.०६.२०२३ रोजी १५.०० वा., ई-निविदा उघडण्याची तारीख व वेळ : ०२.०६.२०२३ रोजी १५.३० वाजता. संकेतस्थळ : http://www.ireps.gov.in वर निविदा पाहू शकता. 0177

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly

## जाहीर सूचना

जनतेच्या माहितीकरिता याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की, आमचे अशील श्रेयस इंडस्ट्रियल इस्टेट, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६३ येथे स्थित युनिट क्र. ए-१० (सदर युनिट)चे संपूर्ण आणि नि:संशय मालक आहेत.

सदर युनिटच्या संदर्भातील शीर्षक करारनाम्याची आधीची साखळी म्हणजेच (i) मे. श्रेयस बिल्डर्स अॅण्ड क्राऊन पॅकिंग कॉर्पोरेशन यांच्या दरम्यान बनलेले दिनांक २०.०४.१९७५ रोजीचे करारपत्र, (ii) मे. क्राऊन पॅकिंग कॉर्पोरेशन आणि श्री श्याम सुंदर अमिरचंद साहनी आणि श्री एस. एस. भाटिया यांच्या दरम्यान बनलेले दिनांक १५.०६.१९७७ रोजीचे करारपत्र, (iii) श्री श्याम सुंदर अमिरचंद साहनी आणि श्री सुंदर श्याम भाटिया आणि मे. प्रगती सिल्क मिल्स यांच्या दरम्यान बनलेले दिनांक ०५.०८.१९७७ रोजीचे करारपत्र, हरवली किंवा गहाळ झाली आहे आणि/किंवा अत्यंत परिश्रमपूर्वक शोधून देखील सापडत नाही.

सदर शीर्षक करारनाम्याच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, कॉपीराईट दस्तऐवज, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार, देखबाल, वहिवाट, योजना, मृत्युपत्र किंवा बोजा मार्गे किंवा अन्य कशाही प्रकारे कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत कागदोपत्री पुराव्यासह निम्नस्वाक्षरीकारांना सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सूचित करावे. असे न केल्यास असे कोणतेही दावे दुर्लक्षित करण्यात येतील आणि सोडून दिले आणि/किंवा गुंडाळून ठेवले असे समजण्यात येईल.

दि. १३ मे, २०२३ सही/-
**सौ. पूनम साळसकर,**
वकील
१०७/बी विंग, सहारा क्लासिक,
सुबा इंटरनॅशनलसमोर, सहार रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९९.

**रामेश्वर मीडिया**

## जाहीर सूचना

**कांदिवली येथे प्लॅटफॉर्म क्र. ४ येथे दक्षिण एफओबी आणि बृमुंमपा एफओबी जोडणारा विद्यमान स्कायवॉक बंद राहील**

**कांदिवली येथे प्लॅटफॉर्म क्र. ४ येथे दक्षिण पादचारी पूल आणि बृमुंमपा पादचारी पूल जोडणारा विद्यमान स्कायवॉक प्रस्तावित बुकींग कार्यालयाचे समायोजन करण्यासाठी पाडणे आवश्यक आहे. म्हणून कांदिवलीचा स्कायवॉक दिनांक १६.०५.२०२३ पासून बंद राहील. प्रवाशांना होणाऱ्या गैरसोईसाठी मन:पूर्वक दिलगीर आहोत.**

पश्चिम रेल्वे www.wr.indianrailways.gov.in G20 Azadi Ka Amrit Mahotsav 0174

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly

## फॉर्म पी11
## ठराव योजनांकरिता आमंत्रण

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (प्री-पॅकेज्ड दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०२१ च्या विनियमन ४३ अन्वये)

संबंधित तपशील

| I | II | III |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट धनकोचे नाव | सुदल इंडस्ट्रीज लिमिटेड |
| २. | पूर्वीचे नाव, जर गत दोन वर्षात बदलले असल्यास | लागू नाही |
| ३. | कॉर्पोरेट धनकोच्या स्थापनेचा दिनांक | ०८.०८.१९७९ |
| ४. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट धनकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी-मुंबई |
| ५. | ओळख क्रमांक | L21541MH1979PLC021541 |
| ६. | कॉर्पोरेट धनकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | **नोंद. कार्यालयः** ए-५, एमआयडीसी, अंबड इंडस्ट्रियल एरिया, मुंबई - नाशिक हायवे, नाशिक-४२२०१०, महाराष्ट्र, भारत. **कॉर्पोरेट कार्यालयः** २६ए, नरिमन भवन, २२७ नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१ महाराष्ट्र, भारत. |
| ७. | प्री-पॅकेज्ड दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | २०.०४.२०२३ (आदेश दिनांक २०.०४.२०२३ निम्नस्वाक्षरीकारांना दि. २२.०४.२०२३ रोजी प्राप्त) |
| ८. | ठराव योजनांकरिता आमंत्रणाचा दिनांक | १३.०५.२०२३ |
| ९. | ठराव अर्जदाराकरिता पात्रता | पात्रता निकष उपलब्धः सीडीची वेबसाईटः http://sudal.co.in/ आयपीईची वेबसाईटः http://ssarvi.com/running-cases.php वर |
| १०. | कलम २९ए अन्वये लागू अपात्रतेचे निकष | नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम २४०ए सह वाचावयाच्या कलम २९ए नुसार |
| ११. | मुल्यमापनाचा आधार (महत्त्वपूर्ण सुधारणा आणि टिकच्या आकाराशी संबंधित तपशीलासह) | मूल्यमापनाचे तपशीलवार आधार ठराव व्यावसायिकाकडून sudal.ppirp@gmail.com येथे ईमेल पाठवून प्राप्त करता येतील. |
| १२. | 'ठराव योजनेचे आमंत्रण', मूल्यमापनाकरिता आधार प्राप्त करण्याची पद्धत (महत्त्वपूर्ण सुधारणा आणि टिकच्या आकाराशी संबंधित तपशीलासह), माहिती ज्ञापन आणि अधिक माहिती | कागदपत्रे पात्रता निकषमध्ये नमूद केल्यानुसार अटींचे पालन करण्याच्या अधीन राहून, ठराव व्यावसायिकाकडून sudal.ppirp@gmail.com येथे ईमेल पाठवून प्राप्त करता येतील. |
| १३. | ठराव योजनांच्या सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक | २९.०५.२०२३ |
| १४. | ठराव व्यावसायिकास ठराव योजना सादर करण्याची पद्धत | शोधण्यायोग्य स्वरुपामध्ये (संकेतशब्द संरक्षित) सॉफ्ट प्रतीसह मोहोरबंद पाकिटात भौतिक प्रत ठराव व्यावसायिकांना अ. क्र. १८ मध्ये उल्लेखित पत्त्यावर दि. २९.०५.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी वितरित करावी. |
| १५. | निर्णय घेणारे अधिकारी यांना मंजुरीकरिता ठराव योजना सादर करण्याकरिता अंदाजित दिनांक | सीओसी द्वारे निर्णय घेण्यात येईल परंतु १९ जुलै, २०२३ पूर्वी. |
| १६. | ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **प्रशांत जैन** **नोंद. क्र.** IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131 |
| १७. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, ठराव व्यावसायिकाचे नाव, पत्ता आणि ईमेल | **प्रशांत जैन** नोंद. पत्ताः ए५०१, शांती हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९, बी/१०, सेक्टर ११, कोपरखैरणे, ठाणे, नवी मुंबई, महाराष्ट्र - ४०० ७०९. नोंद. ई-मेलः ipprashantjain@gmail.com |
| १८. | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | **पत्रव्यवहाराचा पत्ताः** रसार्वी रेझॉल्यूशन सर्व्हिसेस एलएलपी-आयपीई, बी६१०, बीएसईएल टेक पार्क, सेक्टर ३०ए, वाशी रेल्वे स्टेशनसमोर, वाशी, नवी मुंबई - ४००७०३. पत्रव्यवहाराचा ई-मेलः sudal.ppirp@gmail.com |
| १९. | अधिक तपशील येथे किंवा यांच्याकडे उपलब्ध | sudal.ppirp@gmail.com येथे ईमेल पाठवून ठराव व्यावसायिकांकडून तपशील प्राप्त करता येतील. |
| २०. | फॉर्म प्रसिद्धीचा दिनांक | १३.०५.२०२३ |

सही/-
दिनांकः १३.०५.२०२३ **श्री. प्रशांत जैन**
ठिकाणः मुंबई **नोंद क्र.** IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131
नोंद. पत्ताः ए५०१, शांती हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९, बी/१०, सेक्टर ११, कोपरखैरणे, ठाणे, नवी मुंबई, महाराष्ट्र - ४०० ७०९.